International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# जागतिकीकरण व मराठी साहित्यातील नवप्रवाह – मुस्लिम मराठी साहित्य

**प्रा. मोहन बाबुराव चव्हाण**

*मराठी विभागप्रमुख, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर.*

*Corresponding Author – प्रा. मोहन बाबुराव चव्हाण*

DOI - 10.5281/zenodo.18654315

**सारांश:**

*स्वातंत्र्योत्तर कालखंडात जागृत झालेला नवशिक्षित तरुण वर्ग आपापली दु:खे साहित्यातून मांडू लागला. या समाजापुढे दारिद्र्य, बेकारी, भ्रष्टाचार, दुष्काळ व जातीय दंगली असे प्रश्न उभे होते. त्यातच दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे सर्वसामान्य माणूस खचला. या सर्व परिस्थितीबद्दलची संवेदनशील मनांची प्रतिक्रिया म्हणजेच स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेले विविध वाङ्मयीन प्रवाह होत. ई.स. १९६० नंतर यातूनच विविध वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य, इत्यादी साहित्यप्रवाह उदयास आले. जागतिकीकरणामुळे मराठी साहित्याच्या स्वरूपात व आशयात महत्त्वाचे बदल घडून आले. जागतिक अर्थव्यवस्था, स्थलांतर, शहरीकरण, बाजारसंस्कृती, तंत्रज्ञान आणि बदलती सामाजिक रचना हे विषय या साहित्याच्या केंद्रस्थानी आले.*

**प्रस्तावना**:

शिक्षण घेऊन जागृत झालेला मुस्लिम समाज जेव्हा आपल्या आजूबाजूच्या वास्तवाकडे पाहू लागला, तेव्हा तो भांबावून गेला. आपल्याच देशात त्याच्याकडे संशयाने पाहिले जात होते. त्यांच्या देशाबद्दलच्या निष्ठेकडे संशयाने पाहिले जात होते. परकेपणाची वागणूक त्याच्या वाट्याला येत होती. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मुस्लिम समाजजीवनात प्रचंड उलथापालथ झाली. भारत-पाकिस्तान फाळणीमुळे तर मुस्लिम समाज आपल्याच देशात अपराध्याचे जीवन जगू लागला. गंभीर स्वरूपाच्या समस्या त्याला भेडसावू लागल्या. ही मनाची घुसमट तो साहित्यातून मांडू लागला. सद्य परिस्थिती बदलली पाहिजे, तसेच आपल्या समाजाला मिळणारी भेदभावत्मक वागणूक बदलून आपल्या निष्ठेवर शंका घेतली जाऊ नये, अशा आकांक्षा मुस्लिम साहित्यिकांच्या होत्या. त्याचे फलस्वरूप म्हणून मुस्लिम मराठी साहित्याची निर्मिती होऊ लागली.

**मुस्लिम मराठी साहित्याचे स्वरूप:**

मराठी साहित्य क्षेत्राकडे पाहिले असता, प्रस्थापित लेखकांनी जेथे तळागाळातील, शोषित दलित समाजाचे वास्तव साहित्यातून मांडले नव्हते, तेथे मुस्लिमांचे वास्तव कोण मांडणार? आणि कहर म्हणजे मुस्लिमांचे जे काही चित्रण मराठी साहित्यात आले होते, ते केवळ विकृत स्वरूपातच आले होते. अगदी आधुनिक भाषेचे जनक ज्यांना म्हटले जाते, ते ह. ना. आपटे यांच्यापासून ते श्री. ना. पेंडसे व पु. भा. भावे या साहित्यिकांच्या साहित्यात मुस्लिमांचे विकृत चित्रण केलेले दिसून येते. आपले अस्सल जीवनानुभव, सुख-दुःखे, भावना साहित्यातून मांडाव्यात या तळमळीतून मुस्लिम मराठी साहित्यास गती प्राप्त झाली.

मुस्लिम मराठी साहित्याने कथा, कविता, कादंबरी, गझल, ललितगद्य, आत्मचरित्र इत्यादी महत्त्वाचे साहित्यप्रकार समर्थपणे हाताळले आहेत. शाहीर अमर शेख, सय्यद अमीन, हमीद दलवाई, डॉ. यू. म. पठाण, प्रा.

फ. म शहाजिंदे, प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर, अजीज नदाफ, खलील मोमीन, बशीर मुजावर, ऐ. के. शेख, मुबारक शेख, जावेद कुरेशी, रफीक सूरज, सय्यद अल्लाउद्दीन, डी. के. शेख, खातून मतीकोप, आशा अपराद, फातिमा मुजावर, फरजाना डांगे, शेख इक्बाल, समर खडस, रजिया सुल्ताना इत्यादी अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी उत्कृष्ट साहित्यनिर्मिती केली आहे. यातून मुस्लिम समाजाचे जीवन, त्यांची संस्कृती, विचारधारा, सुख-दु:खे व अस्सल अनुभव व्यक्त झाले आहेत. एकूण, मुस्लिम मराठी साहित्याने मराठी साहित्यक्षेत्र आपल्या सकस व नावीन्यपूर्ण कलाकृतींनी समृद्ध बनविले आहे. मुस्लिम मराठी साहित्य हा मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, इत्यादि महत्त्वाच्या साहित्यांप्रमाणेच एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह होय. मुस्लिम मराठी लेखकांनी विपुल साहित्य निर्मिती केली आहे. मुस्लिम सुफी संतांच्या उत्कृष्ट वाङ्मयीन कामगिरीपासून ते आजतागायत मुस्लिम मराठी साहित्याचा प्रवाह अखंडपणे वाहत आहे.

**मुस्लिम मराठी साहित्य : संकल्पना:**

मुस्लिम मराठी साहित्य ही संकल्पना तशी जुनीच आहे. १९३६ साली सांगलीचे सय्यद अमीन या मराठी लेखकांनी ‘मुस्लिम मराठी साहित्य या नावाचे एक साप्ताहिक सुरु केले होते. अमीन यांच्या मृत्यूनंतर मराठीचे प्रसिद्ध समीक्षक श्री. के. क्षीरसागर यांनी ‘एक सत्त्वस्थ मुस्लिम मराठी साहित्यिक या शीर्षकाचा एक मृत्युलेख लिहिला होता. तेव्हापासून ‘मुस्लिम मराठी साहित्य ही संज्ञा अस्तित्वात आली.

मराठीतील सुप्रसिद्ध संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी ‘मुस्लिम मराठी संत कवी या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे, तसेच ‘मुसलमान (सूफी) संतांचे मराठी साहित्य हे डॉ. यू. म. पठाण यांचे पुस्तक आहे. म्हणजेच या मराठी लेखकांच्या वेगळया जातीचा उल्लेख सूचकतेने केलेला आहे.

१९५० नंतर महाराष्ट्रात मुस्लिम साहित्यिक मराठीत लेखन करू लागले, तेव्हा त्यांच्या साहित्याला कोणते शीर्षक द्यावे, हा प्रश्न मुसलमान व मुसलमानेत्तर साहित्यिकांच्या मनात निर्माण झाला होता. तेव्हा काही मुसलमान साहित्यिकांनी एकत्र येऊन ‘अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदे ची स्थापना केली. अशाप्रकारे मुस्लिम मराठी साहित्याची चळवळ २४ ते २६ मार्च १९९० मध्ये सोलापूर येथे झालेल्या पहिल्या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनापासून सुरु झाली. या संस्थेचा उद्देश मुस्लिम मराठी साहित्यिकांना स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि मुस्लिम मराठी साहित्यिकांची साहित्यक्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण करून देणे हा होता.

**मुस्लिम मराठी साहित्य : व्याख्या :**

१. प्रा. फ. म. शहाजिंदे: सर्वांगीण असे मुस्लिम समाज जीवनाचे जिवंत चित्रण मुस्लिम मानसिकतेसह ज्या मराठी लेखनात वास्तवतेच्या पातळीवर आढळते ते मुस्लिम मराठी साहित्य होय.
२. प्रा. फकरुद्दीन बेन्नूर: मराठी मुसलमान लेखकांचे साहित्य आणि महत्त्वाचे म्हणजे 'मुसलमान' म्हणून व 'मराठी माणूस' म्हणून जगत असताना जे ताण तणाव निर्माण होतात ते व्यक्त करणारे आणि त्यामधून समताण शोधण्याचा प्रयत्न करणारे साहित्य होय.
३. प्रा. जावेद कुरेशी : मुस्लिम समाजातील दलित सदृश्य जातीजमातीचा शोषणाविरूद्धचा व अंतर्बाह्य कोंडीतून सुटण्याच्या धडपडीचे, उपेक्षा व यातनांचे

वास्तववादी चित्रण म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य होय.

४. डॉ. ताहेर एच. पठाण : मुस्लिम समाजातील रुढी, परंपरा, रितीरिवाज, दुःख, दारिद्र्य, वेदना व विद्रोह, विषमता, याचे चित्रण वास्तवतेच्या पातळीवर येऊन मुस्लिम मानसिकतेसह ज्या साहित्यात चित्रित होत असेल त्याला मुस्लिम मराठी साहित्य म्हणता येईल.

५. एहतेशाम देशमुख : मुसलमान वा मुसलमानेतर मराठी साहित्यिकांनी प्रचलित मुसलमान मन, संस्कृती आणि मुसलमानांच्या अंतर्बाह्य प्रश्नांचा उहापोह ज्या साहित्यकृतीत सकारात्मकरीत्या केला असेल ते साहित्य म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य होय.

६. प्रा. डॉ. जुल्फी : मुस्लिमत्व आणि त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक वैशिष्ट्यांसह देशीय घटितांनी निर्माण केलेल्या मानवी अस्तित्वाचे, जीवन संघर्षाचे वैश्विक चित्रण म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य होय.

७. जावेद पाशा : ब्राह्मणवादी व्यवस्थेतील त्या शोषितांचे ज्यांनी सांस्कृतिक विद्रोह करून धर्मांतरण केले, परंतु धर्मांतरानंतरही त्यांचे सर्वंकष शोषण ब्राह्मणवादी व्यवस्था करीत आहे त्याचे विद्रोही व वास्तववादी चित्रण म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य होय, ज्याचा गाभा माणूस आहे आणि पाया समता.

**वरील व्याख्यांचा विचार करता पुढील निरीक्षणे मांडता येतात** -

१) मुस्लिम मराठी साहित्य लेखनासाठी मुस्लिम मानसिकता असणेच आवश्यक आहे. जो जातीने मुस्लिम आहे, आणि त्याचा स्वतःवर मुस्लिम असण्याचा विश्वास आहे, त्यांचेच साहित्य केवळ मुस्लिम मराठी साहित्य ठरेल.

२) इतर साहित्य प्रवाह जसे ग्रामीण, ख्रिस्ती, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, इत्यादी साहित्य प्रवाह मराठी साहित्यात वेगवेगळ्या नावानेच पुढे आले आहेत. कारण मराठी साहित्याचा प्रवाह म्हणून एकत्रितपणे या प्रवाहांचा समावेश केला तर त्या प्रवाहांना न्याय मिळणार नाही. पारंपारिक साहित्यात त्या-त्या प्रवाहांच्या वेदनेचा प्रश्न महत्त्वाचा ठरणार नाही. त्याची घुसमट, वेदना केवळ तेच मांडू शकतात. मुस्लिम मराठी साहित्यही यास अपवाद नाही.

३) ज्या मुस्लिम साहित्यिकाने मुस्लिम मानसिकतेसह मराठी साहित्यलेखन केले असेल केवळ त्यास 'मुस्लिम मराठी साहित्य' असे म्हणता येईल.

४) एहतेशाम देशमुख यांनी मुसलमान व मुसलमानेतर दोघांच्या साहित्यास मुस्लिम मराठी साहित्य मानले आहे, परंतु या व्याख्येचा स्वीकार केल्यास मुस्लिम मराठी साहित्यास 'मुस्लिम' असण्याची मर्यादा राहणार नाही व या प्रवाहास निश्चितपणा येणार नाही.

५) डॉ. जुल्फी यांच्या व्याख्येत प्राचीन मुस्लिम मराठी साहित्यास बसविता येत नाही, कारण त्यात मुस्लिमपण आढळत नाही. आध्यात्मिक भूक हेच त्यांच्या लेखनामागील आदर्श होते.

**मुस्लिम मराठी साहित्य : एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून स्थान :**

१) मराठी साहित्याच्या प्रदीर्घ परंपरेत मध्ययुगापासूनच मुस्लिम संत कवींनी लेखन केले आहे. या कालखंडात जवळपास ४९ मुस्लिम मराठी साहित्यिकांनी लेखन केले, हे 'मुसलमान (सूफी) संतांचे मराठी साहित्य' या डॉ.यू.म.पठाण यांच्या ग्रंथावरून सप्रमाण सिद्ध होते. तसेच आधुनिक

काळातही ललित व ललितेतर लेखनात मुस्लिम मराठी लेखक-कवींची परंपरा दाखविता येते.

२) मुस्लिम मराठी साहित्यिकांनी मराठी साहित्याला दिलेले योगदान महत्त्वपूर्ण व अर्थपूर्ण आहे.

३) भारतीय बहुतांश मुस्लीम हा धर्मांतरित आहे. आपल्या समाजात उपेक्षा झाल्यामुळेच तळागाळातील लोकांनी धर्मांतर केले. तरीसुद्धा त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. भारतातील मुस्लीमही दलितसदृश्य शोषित जीवनच जगत होता. ही घुसमट मुस्लिमांनी आपल्या लेखनातून मांडली.

४) मुस्लीम मराठी साहित्यात मुस्लिमांचे जीवन, त्या जीवनातील अस्सल अनुभव, त्यांची संस्कृती, विचारधारा, सुख-दु:खे इत्यादींचे प्रकटीकरण करण्याचे सामर्थ्य आहे.

५) मुस्लीम मराठी लेखकांनी आपल्या साहित्यात योजलेली मराठी संस्कृतीचाच महत्त्वपूर्ण आविष्कार असलेली दख्खनी भाषा हा मराठी साहित्यातील एक अभिनव प्रयोग होता.

६) ग्रामीण भागातील मुस्लिमांचे व्यवसाय म्हणजे शेती, मुलाणकी, बागवानी, शिकलगारी, विणकाम, धोबीकाम, अत्तरी, कासारकाम इत्यादी होत. तसेच शहरी भागातीलही मुस्लीम समाज प्रामुख्याने गॅरेज व्यवसाय, वाहन चालक, शिलाईकाम, फळे विकणे अशा प्रकारचे व्यवसाय करत असतो. याचे मूळ कारण या समाजात असलेले अज्ञान व दारिद्र्य होय. मुस्लिमांचे हे भयावह चित्र मुस्लीम मराठी लेखकांनी आपल्या लेखनात मांडले.

७) मुस्लीम मराठी साहित्याच्या पाठीमागे भक्कम वैचारिक पाठबळ किंवा तत्त्वज्ञान नाही, पण एकूण साहित्यातून मुस्लीम जीवनाचा विचार प्राधान्यक्रमाने मांडला आहे.

८) मुस्लीम समाज हा त्रिवार तलाक, हिलाल, बहुपत्नीत्व, कुटुंबनियोजन न करणे अशा धार्मिक रुढींनी ग्रासलेला होता. हे प्रश्न मराठी साहित्याच्या दृष्टीने नवीन होते. आपली ही घालमेल मुस्लीम मराठी साहित्यात लेखकांनी मांडली.

९) मुस्लीम मराठी साहित्यिकांनी कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य, वैचारिक लेखन, गझल, बालसाहित्य अशा बहुतेक सर्व साहित्यप्रकारांत लेखन केले आहे.

**मुस्लिम मराठी साहित्यामागील प्रेरणा:**

मुस्लिम मराठी साहित्यामागील प्रेरणांविषयी डॉ. गिरीश मोरे लिहितात, "....भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी दिलेली संसदीय लोकशाही सर्व धर्मातील लोकांना स्वातंत्र्य बहाल करते. त्यामुळे प्रत्येकजण आपापल्या धर्मानुसार जगण्यासाठी भयमुक्त झाला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रनिष्ठा, अहिंसा ही मूल्ये भारताला बुद्धाने दिली. पुढे महंमद पैगंबरांनी दिली. जोतीराव फुल्यांनी दिली. तीच संविधानात बाबासाहेबांनी अंतर्भूत केली. त्यामुळे 'डॉ. आंबेडकर' या कवितेतून जावेद कुरेशी पाशा म्हणतात,

‘डॉ. आंबेडकर
तुमच्या विचारांचे शस्त्र हाती घेऊन
मी युद्धरत आहे.
पण आंबेडकर
सांस्कृतिक अस्मितेसह मी शोषित कसा ?
याचे उत्तर धर्मग्रंथात नव्हे
तुझ्या लेखणीत गवसले!
आता मी निर्धास्त आहे
एका हातात मुस्लिम अस्मिता
दुसऱ्या हातात संविधान आहे’

कवितेतल्या या ओळी बाबासाहेबांचे मुस्लिम साहित्यप्रवाहातील स्थान मांडण्यासाठी उपयुक्त ठरतात. फ. म. शहाजिंदे यांनी असे म्हटले आहे की "महंमद पैगंबर, सुफी संत, जोतिराव फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा विचार हे मुस्लिम मराठी साहित्याचे ऊर्जाकेंद्र आहे. या विचारांच्या बळावर मुस्लिम मराठी साहित्य निर्माण होत आहे असे म्हणून या प्रवाहाचा प्रेरणास्रोत सांगितलेला आहे."

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मुस्लीम समाज जीवनाच्या जीवन जाणिवा बदलल्या. या बदलत्या जाणिवांचा वेध मुस्लीम समाजातील संवेदनशील मनांनी घेतला. आपल्या समाजाचे वास्तव त्याला जाणवू लागले. आपल्या समाजावर होणारा अन्याय तो साहित्यातून मांडू लागला, तसेच आपापल्या समाजातील रुढी-परंपरा, धार्मिक बंधने, रिती-रिवाज यांकडेही उघड्या डोळ्यांनी पाहू लागला. त्याविषयीचे आपले मत तो साहित्यातून व्यक्त करू लागला. आपल्या मनातील घालमेल तो साहित्याद्वारे मांडू लागला. हे व्यक्त करण्यासाठी तो विविध साहित्य प्रकाराचा अवलंब करू लागला. त्या लेखकांचे हे हृद्गत बऱ्याच अंशी गुणात्मकदृष्ट्या समृद्ध होते, तसेच या लेखनामध्ये सातत्यही असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुस्लिम मराठी साहित्य हा मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह मानला जातो.

**समारोप:**

मुस्लिम मराठी साहित्यातून मुस्लिमांचे अलक्षित आणि गुदमरलेले जीवन व्यक्त होते. भारतीय समाजातील तळागाळातले बहुतांश मुस्लिम हे धर्मांतरित असल्यामुळे त्यांची गत इथे दलितांपेक्षा काही वेगळी नाही. अज्ञान, दारिद्र्य आणि शोषण यांबरोबरच मुस्लिमांच्या वाट्याला परकेपणाची वागणूकही येते. या पार्श्वभूमीवरच मुस्लिम मराठी साहित्याची निर्मिती झाली आहे. म्हणूनच या प्रवाहाची चेतनासुद्धा दलित साहित्य प्रवाहाप्रमाणेच माणुसकीची पहाट शोधणारी आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**

१) मौलाना सय्यद अबुल आला मौदूदी (रह.) मराठी भाषांतर-अब्दुलजब्बार कुरैशी, कुतबुद्दीन हुसैन मनियार, मुबारक हुसैन मनियार, दिव्य कुरआन-सटिप मराठी भाषांतर, बोर्डस ऑफ कुरआन, मुंबई. प्र. आ. २०११.

२) डॉ. ताहेर एच. पठाण, प्रा. अर्चना सोनावणे (संपादक), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, संकल्प प्रकाशन लातूर, प्र. आ. २०१३.

३) डॉ. अविनाश सांगोलेकर, दलित साहित्य : उगम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्र. आ. २०१०.

४) प्रा. फ. म. शहाजिंदे, प्रा. फारुख तांबोळी(संपादक), मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप, मुस्लिम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळ, लातूर आणि भूमी प्रकाशन, लातूर, प्र. आ. २०१४.

५) यशवंत दिनकर फडके(संपादक), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. १९६९.

६) डॉ. ताहेर एच. पठाण, प्रा. अर्चना सोनावणे (संपादक), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, संकल्प प्रकाशन लातूर, प्र. आ. २०१३.

७) डॉ. अविनाश सांगोलेकर, दलित साहित्य : उगम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र. आ. २०१०.